# लवाद, नगर रचना परियोजना क्र. ९

बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग) यांचे कार्यालय

नैना कार्यालय, टॉवर नं. १०, सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल, सीबीडी बेलापूर- नवी मुंबई – ४००६१४

## जाहीर सूचना

क्रमांक: लवाद /नरयो-९/साधारण/२०२४/०१ दि. ०५/०९/२०२४

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३७ च्या कलम ६८ (२) मधील तरतुदीनुसार प्रारुप नगर रचना योजना सिडको नैना क्र. ९ ही योजना उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, सिडको, यांचेकडील अधिसूचना क्रमांक सिडको/नैना/टीपीएस-९/२०२४/२०१ दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ प्रमाणे मंजूर केली आहे. उक्त् अधिसूचना ही महाराष्ट्र शासन राजपत्रात असाधारण भाग-२ मध्ये दिनांक २७ फेब्रुवारी २०२४ रोजी प्रसिध्द् झालेली आहे.

उपनिर्दिष्ट नगर रचना योजनेतील सर्व संबंधीतांना या सूचनेद्वारा जाहीर करण्यात येते की, कलम ७२ मधील तरतुदीप्रमाणे, प्रारुप नगर रचना योजना नैना क्र. ९. ला अंतिम स्वरुप देण्यासाठी निम्नस्वाक्षरीकार यांची लवाद म्हणून नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील कलम ७२(१) खालील अधिसूचना क्र.टीपीएस-१२२४/८२१/प्र.क्र. ५८/२४/नवि -१२ दिनांक १२ जुलै २०२४ अन्वये नियुक्ती केली असून सदरहू अधिसूचना दिनांक ८-१४ ऑगस्ट २०२४ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र कोकण विभाग पुरवणी, यावर प्रसिध्द झालेली आहे.

तसेच सर्व हितसंबंधीतांना, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम ७२ मधील तरतुदीनुसार आणि त्याअंतर्गत केलेल्या महाराष्ट्र नगर रचना योजना नियम १९७४ च्या नियम १३ नुसार, या सूचनेद्वारे जाहीर कळविण्यात येते की, आज दिनांक ०५/०९/२०२४ रोजी नियुक्त् लवाद यांनी वरील योजने संदर्भात लवादीय कामकाजास सुरवात केली आहे आणि या योजनेमुळे बाधित झालेल्या जमीन धारकांना प्रत्यक्ष हजर राहून आपले म्हणणे मांडण्यासाठी यथावकाश फार्म क्र. ४ मधील लेखी सूचनेद्वारे त्यांचेकडून कळविण्यात येणार आहे.

वरील प्रमाणे योजना तयार केल्यामुळे, ज्या जमीन धारकांच्या कोणत्याही मिळकती बाधित (Injuriously Affected) होतील आणि त्यामुळे कलम १०२ प्रमाणे यासंदर्भात मोबदला देय असेल त्यांनी निम्नस्वाक्षरीकार यांचेकडे, सदरहू नोटीस महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द् झाल्याच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत, त्यांची मागणी दाखल करणे आवश्यक राहील.

तसेच याद्वारे जाहीर करण्यात येते की, वरील शासन मंजूर प्रारुप योजना अंतिम करण्यासंदर्भात, अधिनियमांच्या कलम ७२ मधील तरतुदींप्रमाणे कार्यवाही करताना, या योजनेची प्रथमत: प्राथमिक न.र.यो आणि अंतिम न.र.यो याप्रमाणे उपविभागणी करुन तदानंतर पुढील वैधानिक कार्यवाही करण्यात येणार आहे.

(अभिराज गिरकर)
लवाद,
नगर रचना परियोजना क्र.९ (नैना)
बेलवली (भाग), भेरले (भाग), भिंगार (भाग), बोर्ले, चिखले (भाग), कोन (भाग), लोणीवली (भाग), सांगडे (भाग) आणि वारडोली (भाग)

दिनांक-०५/०९/२०२४
नैना कार्यालय, टॉवर नं. १०,
सातवा मजला, बेलापूर रेल्वे स्टेशन संकुल,
सीबीडी बेलापूर- नवी मुंबई – ४००६१४

**OFFICE OF THE ARBITRATOR, TOWN PLANNING SCHEME, NAINA NO. 9**
**(Belavali (pt), Bherle (pt), Bhingar (pt), Borle, Chikhale (pt), Kon (pt), Loniwali (pt), Sangade (pt) and Wardoli (pt))**

## Public Notice

(Under Rule no.13 of the Maharashtra Town Planning Schemes Rules, 1974)

No. ARB/TPS-9/GEN/2024/01 Date: 05/09/2024

The draft Town Planning Scheme No.9 of NAINA at village (Belavali (pt), Bherle (pt), Bhingar (pt), Borle, Chikhale (pt), Kon (pt), Loniwali (pt), Sangade (pt) and Wardoli (pt)) of Taluka – Panvel, District – Raigad has been sanctioned by the Vice Chairman & Managing Director, CIDCO under sub Section (2) of section 68 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereafter referred to as "the said Act") *vide* Notification No. CIDCO/NAINA/TPS-9/2024/201 dated 27th February, 2024, in exercise of the powers delegated to him by Urban Development Department vide Notification No.TPS-1817/973/C.R.103/17/UD-13, dated 13th September, 2017. The said Notification is published in *Maharashtra Government Gazette*, Extraordinary, Part-II dated 27th February, 2024.

The Government of Maharashtra in Urban Development Department has appointed Shri Abhiraj Girkar, Retired Joint Director of Town Planning as the Arbitrator for the said sanctioned Draft Scheme vide Notification No. TPS-1224/821/C.R.58/24/UD-12 dated 12th July 2024 under sub-section (1) of Section 72 of the said Act. This Notification has been appeared in the Maharashtra Government Gazette, Konkan Division supplement, Part –I, dated 8-14 August 2024.

I, the undersigned therefore in accordance with Rule No.13 of Maharashtra Town Planning Schemes Rules 1974, declare by this Notice that, I have commenced the duties as Arbitrator for Town Planning Scheme No.9 of NAINA at village (Belavali (pt), Bherle (pt), Bhingar (pt), Borle, Chikhale (pt), Kon (pt), Loniwali (pt), Sangade (pt) and Wardoli (pt)) from 5th September, 2024.

All the owners of the lands included in this Town Planning Scheme will be served with special notice in form No.4 to submit their suggestions or objections in respect of proposals of the sanctioned draft Town Planning Scheme in due course.

Those owners or interested persons of the lands included in the Town Planning Scheme No.9, who have been injuriously affected by making of this scheme are hereby informed that they shall be entitled to make a claim of compensation as per Section 102 of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966, before the undersigned within a period of 60 days from the date of appearing this Notice in the *Maharashtra Government Gazette.*

It is hereby declared that the said draft Town Planning Scheme No.9 shall be sub-divided in to a preliminary scheme and final scheme as per the provision under Section 72 of the said act and processed further.

**(Abhiraj Girkar)**
**Arbitrator**
Town Planning Scheme No. 9 NAINA
(Belavali (pt), Bherle (pt), Bhingar (pt), Borle, Chikhale (pt), Kon (pt), Loniwali (pt), Sangade (pt) and Wardoli (pt))

Dated: 5th Sept 2024
Place: NAINA Office, 7th floor, Tower No. 10,
Belapur Railway Station Complex,
C.B.D. Belapur- 400 614.